महसूल व वन विभाग, शासन निर्णय दि.१०.०३.२००५ मधील विहित अटींची पूर्तता करीत असणाऱ्या परंतु दि.३१.१०.२००५ नंतर शासन सेवेत सामावून घेतलेल्या विनावेतन प्रतिलिपिक कर्मचाऱ्यांना जुनी निवृत्तीवेतन योजना लागू करणेबाबत...

**महाराष्ट्र शासन**
**महसूल विभाग,**
**शासन निर्णय क्र.एसआरव्ही-२०१६/प्र.क्र.१७२/(E-166475)/ आस्था-७**
**मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.**
**दिनांक : ३१ ऑगस्ट, २०२६.**

**संदर्भ** : १. महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.एस-३०/२००२/प्र.क्र.२२०/ई-७, दि.१०.०३.२००५.
२. वित्त विभाग, शासन निर्णय क्र.अंनियो-१००५/१२६/सेवा-४, दि.३०.१०.२००५.

**पार्श्वभूमी :**

महसूल विभागातील विनावेतन प्रतिलिपिकांना शासन सेवेत सामावून घेण्याबाबतच्या रिट याचिका क्र.१८८२/२००२ यामध्ये मा.उच्च न्यायालयाने दि.१९.०९.२००२ रोजी, ज्या विनावेतन लिपिकांना सेवेची बारा ते चौदा वर्ष पूर्ण झालेली आहेत, अशा विनावेतन लिपिकांना शासनाच्या दि.२२.१०.१९९६ रोजीच्या शासन निर्णयाच्या धर्तीवर योजना तयार करून सहा महिन्याच्या आत शासन सेवेत सामावून घेण्याबाबत निर्देश दिले. सदर निर्देशांच्या अनुषंगाने महसूल विभागाच्या संदर्भित क्र.१ येथील शासन निर्णय क्र.एस-३०/२००२/प्र.क्र.२२०/ई-७, दि.१०.०३.२००५ अन्वये, विनावेतन प्रतिलिपिकांना शासन सेवेत तात्काळ सामावून घेणेबाबत सर्व जिल्हाधिकाऱ्यांना निर्देश देण्यात आले. सदर निर्देशांनुसार ज्या जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांच्या आस्थापनेवरील विनावेतन प्रतिलिपिकांना दि.०१.११.२००५ पूर्वी शासन सेवेत सामावून घेतले, अशा विनावेतन प्रतिलिपिकांना जुनी निवृत्तवेतन योजना म्हणजेच महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ व निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण नियम, १९८४ व सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजनेचे लाभ लागू झाले आहेत.

जिल्हाधिकारी ठाणे यांच्या आस्थापनेवरील ०२ कर्मचारी, जिल्हाधिकारी पालघर यांच्या आस्थापनेवरील ०२ कर्मचारी, जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग यांच्या आस्थापनेवरील १० कर्मचारी, जिल्हाधिकारी अहिल्यानगर यांच्या आस्थापनेवरील ०३ कर्मचारी, जिल्हाधिकारी नंदुरबार यांच्या आस्थापनेवरील ०५ कर्मचारी, जिल्हाधिकारी छत्रपती संभाजीनगर यांच्या आस्थापनेवरील ०२ कर्मचारी, जिल्हाधिकारी सोलापूर यांच्या आस्थापनेवरील १६ कर्मचारी व जिल्हाधिकारी धाराशिव यांच्या आस्थापनेवरील ०१ कर्मचारी असे एकूण ४१ विनावेतन प्रतिलिपिकांचे जे महसूल विभागाच्या दि.१०.०३.२००५ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदींची पूर्तता करीत होते परंतु प्रशासकीय कारणास्तव त्यांचे सन २००६ ते सन २००७ यादरम्यान शासन सेवेत समावेशन करण्यात आलेले आहे. तथापि, दरम्यानच्या कालावधीत संदर्भित क्र.२ येथील वित्त विभाग, शासन निर्णय क्र.अनियो-१००५/ १२६/सेवा-४, दि.३१.१०.२००५ अन्वये, दि.०१.११.२००५ रोजी किंवा तद्नंतर शासन सेवेत रूजू होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी अंशदायी परिभाषीत निवृत्ती वेतन योजना (नवीन पेन्शन योजना) लागू करण्यात आल्यामुळे, दि.०१.११.२००५ नंतर सामावून घेण्यात आलेल्या सदर ४१ विनावेतन प्रतिलिपिकांना अंशदायी परिभाषीत निवृत्ती वेतन योजना (नवीन पेन्शन योजना) लागू करण्यात आलेली आहे.

महसूल विभागाच्या दि.१०.०३.२००५ च्या शासन निर्णयान्वये, यापूर्वी शासन सेवेत सामावून घेण्यात आलेल्या विनावेतन प्रतिलिपिकांना जुनी निवृत्तवेतन योजना म्हणजेच महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन)

नियम १९८२ व निवृत्तीवेतनाचे अंशराशीकरण नियम, १९८४ व सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजनेचे लाभ लागू झाले आहेत, मात्र उक्त ४१ विनावेतन प्रतिलिपिक कर्मचाऱ्यांना प्रशासकीय कारणास्तव त्यांचे दि.०१.११.२००५ नंतर शासन सेवेत सामावून घेण्याचे आदेश निर्गमित केल्याने त्या ४१ विनावेतन लिपिकांना अंशदायी परिभाषीत निवृत्तीवेतन योजना (नवीन पेन्शन योजना) लागू होवून विरोधाभासाची परिस्थिती निर्माण झाली आहे. सदर विरोधाभासाची परिस्थिती दूर करण्याची बाब शासन स्तरावर विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय</u>** :

महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.एस-३०/२००२/प्र.क्र.२२०/ई-७, दि.१०.०३.२००५ अन्वये, जिल्हाधिकारी ठाणे यांच्या आस्थापनेवरील ०२ कर्मचारी, जिल्हाधिकारी पालघर यांच्या आस्थापनेवरील ०२ कर्मचारी, जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग यांच्या आस्थापनेवरील १० कर्मचारी, जिल्हाधिकारी अहिल्यानगर यांच्या आस्थापनेवरील ०३ कर्मचारी, जिल्हाधिकारी नंदुरबार यांच्या आस्थापनेवरील ०५ कर्मचारी, जिल्हाधिकारी छत्रपती संभाजीनगर यांच्या आस्थापनेवरील ०२ कर्मचारी, जिल्हाधिकारी सोलापूर यांच्या आस्थापनेवरील १६ कर्मचारी व जिल्हाधिकारी धाराशिव यांच्या आस्थापनेवरील ०१ कर्मचारी असे एकूण ४१ विनावेतन प्रतिलिपिकांना संबंधित जिल्हाधिकारी यांनी त्यांच्या आदेशान्वये सन २००६ ते सन २००७ यादरम्यान शासन सेवेत सामावून घेतले आहे. अशा शासन सेवेत सामावून घेतलेल्या ४१ विनावेतन प्रतिलिपिकांना त्यांच्या नियुक्तीच्या (त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या) दिनांकापासून जुनी निवृत्तीवेतन योजना म्हणजेच महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ व निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण नियम, १९८४ व सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजनेचे लाभ लागू करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नाव | नियुक्तीचा दिनांक |
|---|---|---|
| १ | श्री.सुरेंद्र काशिनाथ आळशी | दि.१२.१०.२००६ |
| २ | श्रीमती अनिता अनिल चव्हाण | दि.१२.१०.२००६ |
| ३ | श्री.नरेंद्र किसन गोसावी | दि.१२.१०.२००६ |
| ४ | श्री.अनंता शांताराम पाटील | दि.०७.११.२००६ |
| ५ | श्री.श्रीधर दिगंबर धारगळकर | दि.१९.०९.२००६ |
| ६ | श्री.विलास रामचंद्र वेंगुर्लेकर | दि.१९.०९.२००६ |
| ७ | श्रीमती उज्वला सुर्यकांत राऊत | दि.२६.०३.२००७ |
| ८ | श्रीमती सुरेखा नारायण जोशी | दि.२६.०३.२००७ |
| ९ | श्री.निळकंठ पुंडलिक म्हैसकर | दि.२६.०३.२००७ |
| १० | श्री.सुधाकर मारूती सरवणकर | दि.२६.०३.२००७ |
| ११ | श्री.पुरूषोत्तम कृष्णा वारंग | दि.१३.०२.२००६ |
| १२ | श्री.अर्जुन सखाराम पंडीत | दि.१०.०२.२००६ |
| १३ | श्रीमती नलिनी बाबली दळवी / रेमुळकर | दि.१०.०२.२००६ |
| १४ | श्री.गोविंद रघुनाथ परब | दि.१०.०२.२००६ |
| १५ | श्री.गिरीश मधुकर गायकवाड | दि.२५.०५.२००६ |
| १६ | श्री.शेख हमीद बाबूमिया | दि.०९.०२.२००७ |
| १७ | श्री.सतिश भानुदास ताकटे | दि.०९.०२.२००७ |

| | | |
|---|---|---|
| १८ | श्री.गोकुळ रतन पाटील | दि.३१.१२.२००५ |
| १९ | श्री.विजय गंगाधर सोनार | दि.३१.१२.२००५ |
| २० | श्री.संजीव वेडू ब्राम्हणे | दि.३१.१२.२००५ |
| २१ | श्री.प्रभाकर सुदाम ईशी | दि.३१.१२.२००५ |
| २२ | श्री.तुकाराम गोविंद पाटील | दि.३१.१२.२००५ |
| २३ | श्री.बालू कुशीनाथ गवळी | दि.१६.०६.२००६ |
| २४ | श्री.सुनिल सुपडु राऊत | दि.१६.०६.२००६ |
| २५ | श्री.विश्वनाथ आबा भालेराव | दि.०५.०२.२००७ |
| २६ | श्रीमती लता दिगंबर सुर्यवंशी | दि.०५.०२.२००७ |
| २७ | श्री.केराप्पा नाना कोळी | दि.०५.०२.२००७ |
| २८ | श्री.दिनेश रामकृष्ण मोरे | दि.०५.०२.२००७ |
| २९ | श्री.विष्णू नागनाथ देवसकर | दि.०५.०२.२००७ |
| ३० | श्री.शब्बीर महामूद शेख | दि.०५.०२.२००७ |
| ३१ | श्री.गिरीश रघुनाथ कुलकर्णी | दि.०५.०२.२००७ |
| ३२ | श्री.सुधीर भिमराव कुलकर्णी | दि.०५.०२.२००७ |
| ३३ | श्री.इलाही मौला मोगल | दि.०५.०२.२००७ |
| ३४ | श्रीमती शरीफा म्हमुलाल मुलाणी | दि.०५.०२.२००७ |
| ३५ | श्री.हरीदास सदाशिव चांडोले | दि.०५.०२.२००७ |
| ३६ | श्री.रावजी मार्तंड देशपांडे | दि.०५.०२.२००७ |
| ३७ | श्रीमती शारदा तायप्पा साबळे | दि.०५.०२.२००७ |
| ३८ | श्री.नितीन सुरेशराव देशपांडे | दि.०५.०२.२००७ |
| ३९ | श्री.पुरूषोत्तम गणपत आटुळे | दि.०५.०२.२००७ |
| ४० | श्री.नवनाथ विठोबा खंकाळ | दि.०५.०२.२००७ |
| ४१ | श्री.पोपट विश्वनाथ वेदपाठक | दि.२८.०३.२००७ |

सदर शासन निर्णय वित्त विभाग अनौपचारीक संदर्भ क्र.अनौ.२०२६/प्र.क्र.७४/सेवा-४, दि.०४.०८.२०२६ अन्वये प्राप्त मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून, त्याचा सांकेतांक २०२६०८३११७४९५०४३४८ आहे. उक्त शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

JAYSHREE GANESH DUDWADKAR

Digitally signed by JAYSHREE GANESH DUDWADKAR
DN: c=IN, 2.5.4.97=OFN:GOVERNMENT OF MAHARASHTRA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Revenue Department, 2.5.4.20=E219383FDEA8C6797AE319C9737AA5B99CCBF425BF0420D873D267797F6938B8, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=DA057A095D5ECF4E52A85F4AE3EEFA3476B014E6661E1506B9DFD3D2C1FDDBD9, cn=JAYSHREE GANESH DUDWADKAR
Date: 2026.08.31 17:51:14 +05'30'

**(जयश्री दुदवडकर)**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा.महालेखापाल (लेखा परीक्षा / लेखा अनुज्ञेयता), महाराष्ट्र - १ व २, मुंबई व नागपूर.
२. संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

३. जिल्हा कोषागार अधिकारी, ठाणे / पालघर / सिंधुदुर्ग / अहिल्यानगर / नंदुरबार / छत्रपती संभाजीनगर /सोलापूर / धाराशिव.

४. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.

५. निवासी लेखा अधिकारी, मुंबई.

६. मा.मंत्री (महसूल) महोदयांचे खाजगी सचिव / विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई.

७. मा.राज्यमंत्री (महसूल) महोदयांचे खाजगी सचिव / विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई.

८. अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे स्वीय सहायक, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.

९. अपर मुख्य सचिव (वित्त) यांचे स्वीय सहायक, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.

१०. विभागीय आयुक्त, कोकण विभाग / नाशिक विभाग / छत्रपती संभाजीनगर विभाग / पुणे विभाग .

११. जिल्हाधिकारी, ठाणे / पालघर / सिंधुदुर्ग / अहिल्यानगर / नंदुरबार / छत्रपती संभाजीनगर / सोलापूर / धाराशिव.

१२. निवडनस्ती.